New Man International Journal of Multidisciplinary Studies
(UGC Approved Journal No. 45886)
ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

33.

# राजाराम मोहनरॉय यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन

**डॉ.अन्सारी एस.जी.**
समाजशास्त्र विभागप्रमुख
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर ४१३५१७ जि.लातूर

भारतीय समाजातील स्त्रिया सत्तावंचित, संधी वंचित व प्रतिष्ठा वंचित असल्याचे दिसतात. त्यामुळे त्यांना प्रत्येक काळात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांची स्थिती फार बिकट होती. समाजात अंधश्रद्धा, अज्ञान, जातपात, बालविवाह, विधवा विवाह निषेध, बहुविवाह, स्त्री शिक्षणास विरोध, देवदासी प्रथा अशा अनेक समस्या निर्माण झालेल्या होत्या. यापैकी एक समस्या सतीप्रथा होती. 'सती' या शब्दाचा अर्थ पतीव्रता स्त्री या अर्थाने घेतला जातो. सती प्रथा मागे एक आख्यायिका आहे. माता सतीचे पिता दक्ष यांनी योनी भगवान शिवचा अपमान केला. पतीचा अपमान माता सती सहन करू शकली नाही व तिने हवनकुंडात उडी घेऊन प्राण दिले. येथून सतीप्रथा उदयास आली. सती या प्रथेनुसार पतीचा मृत्यू झाल्यास पत्नीला पतीच्या चितेवर जिवंत उडी घेऊन स्वतःचे जीवन संपवले जात असे. व नंतर तिची समाधी बांधून देवीच्या रूपात तिची पूजा केली जात होती. अशी अमानुष प्रथा अस्तित्वात होती. ही प्रथा बंद करण्याचा प्रयत्न मुस्लिम सत्ताधारी लोकांनी केला. पंधराव्या शतकात काश्मिरचे सत्ताधारी सिकंदर यांनी ही प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. मुगल राजे, पेशवा बाजीराव ही प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना यश मिळाले नाही. एकोणिसाव्या शतकात समाजात आंदोलनाला सुरूवात झ ाली व या काळात समाजातील अस्पृश्यता, बालविवाह, स्त्रीशिक्षण, बहुविवाह, सतीप्रथा या विरुद्ध आंदोलन सुरू झाले. यात राजाराम मोहन राय यांनी या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी पुढकार घेतला. त्यांनी स्त्रियांना संपत्तीचा अधिकार मिळावा म्हणून प्रयत्न केला. त्यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली व समाजात सुधारणा घडवून आणण्याचा सुरुवात केली.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम तथ्य संकलनाच्या आधारे करण्यात आला आहे. प्रस्तुत अध्ययनात ग्रंथ, इंटरनेट, साप्ताहिके इत्यादींचा आधार घेण्यात आला आहे.

**उद्देश्य**

१) प्राचीन काळातील स्त्रियांची स्थिती तपासणे.
२) सतीप्रथेविरुद्ध राजाराम मोहन राय यांनी केलेल्या कार्याचे अध्ययन करणे.

भारतीय समाजात सती प्रथा फार पूर्वीपासून असल्याचे निदर्शनास येते. रामायण-महाभारतात सती प्रथेची उदाहरणे सापडतात. रामायणात मेघनाथची पत्नी सुलोचना, महाभारतात पांडूची दुसरी पत्नी माद्री आपल्या पतीसोबत सती गेल्याची उदाहरणे सापडतात. ही प्रथा हिंदू समाजात अस्तित्त्वात असल्याचे निदर्शनास येते. या अमानुष प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी फार पूर्वीपासून प्रयत्न झाले परंतु त्याला धर्माचा आधार व सामाजिक मान्यता असल्यामुळे त्याचे उच्चाटन होऊ शकले नाही. ही प्रथा बंद करण्यासाठी आग्रही भूमिका घेण्याचे काम राजाराम मोहनराय यांनी केले. पाश्चिमात्य देशातील सर्व चांगल्या गोष्टी रुजविण्याचे कार्य राजाराम मोहन रॉय यांनी केले. त्यातीलच एक सती प्रथा १८२९ साली राजाराम मोहनराय यांनी ही प्रथा बंद करण्यासाठी प्रयत्न केले.

प्राचीन काळात सती प्रथा उग्र रूप धारण केली होती. ही अमानुष प्रथा हिंदू धर्मात अस्तित्वात होती. यात अनेक स्त्रियांचा बळी गेला. यातील काही उदाहरणे म्हणजे कोकणात २६ ऑक्टोबर १८२० रोजी रखमाबाई स्वच्छेने सती गेली. या सतीप्रथेत स्वच्छेपेक्षा जबरदस्ती जास्त होती. यात बर्नेने लाहोर येथील पाहिलेला प्रसंग नमूद केला. यात बारा वर्षाची अत्यंत सुंदर गोरीपान नाजुक मुलीला तिच्या आजीने कडेवर घेतले होते. ती मुलगी आईच्या नावाने रडत होती. तिचे हात-पाय बांधून तिला पतीच्या चितेवर ठेवण्यात आले व ती सती गेली. फॅनी पर्कस ही ब्रिटिश गृहिणी तिने यासंदर्भात आपले मत नमूद केले. ७ नोव्हें. १८२३ रोजी उत्तर प्रदेशात बनियाच्या तरुण पत्नीला कुटुंबाच्या दबावाखाली सती जाण्यास तयार केले. परंतु चिता पेटताच तिने चितेतून उडी मारून गंगेच्या पाण्यात जाऊन आग विझवली. नातेवाईक पुन्हा तिला चितेवर घेऊन जाण्यासाठी आले. परंतु ब्रिटिश मॅजिस्ट्रेटने तिचे प्राण वाचवले. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. ज्यात स्त्रियांना त्यांच्या इच्छेविरुद्ध सती जावे लागले.

इ.स.१८१२ मध्ये राजाराम मोहनरायचे मोठे भाऊ जगमोहन यांचे निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांनी बळजबरीने जगमोहनच्या पत्नीला सती जाण्यास भाग पाडले. राजाराम मोहन राय यांनी याप्रसंगी विरोध केला परंतु ते हा प्रकार

थांबवू शकले नाहीत. परंतु त्यांनी ही प्रथा बंद करण्याचा निर्धार केला.

इ.स.१८१५ ते १८२८ पर्यंत सती जाणाऱ्या हिंदू स्त्रियांची सरकारी आकडेवारी खालीलप्रमाणे

**सती प्रथेचे बळी**

| ठिकाण | वर्ष | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **१८१५** | **१८१६** | **१८१७** | **१८१८** | **१८१९** | **१८२०** | **१८२१** | **१८२२** | **१८२३** | **१८२४** | **१८२५** | **१८२६** | **१८२७** | **१८२८** |
| **कलकत्ता** | २५३ | २८९ | ४४२ | ५४४ | ४२१ | ३७० | ३७२ | ३२८ | ३४० | ३७३ | ३९८ | ३२४ | ३३७ | ३०९ |
| **ढाका** | ३१ | २४ | ५२ | ५८ | ५५ | ५१ | ५२ | ४५ | ४० | ४० | १०१ | ६५ | ४९ | ४७ |
| **मुर्शीदाबाद** | ११ | २२ | ४२ | ३० | २५ | २१ | १२ | २२ | १३ | १४ | २१ | ८ | २ | १० |
| **पटना** | २० | २९ | ४९ | ५७ | ४० | ६२ | ६९ | ७० | ४९ | ४२ | ४७ | ६५ | ५५ | ५० |
| **बनारस** | ४८ | ६५ | १०३ | १३७ | २ | १०३ | ११४ | १०२ | १२१ | ९३ | ५५ | ४८ | ४९ | ३३ |
| **बरेली** | १५ | १३ | १३ | १३ | १७ | २० | १५ | १६ | १२ | १० | १७ | ८ | १८ | १० |
| **एकूण** | ३७८ | ४१२ | ८३९ | ८३९ | ६५० | ५९७ | ६५४ | ५८३ | ५५७ | ५७२ | ६३९ | ५११ | ५१७ | ४६३ |

www.aisiakshare.com/node/३

वरील आकडेवारीवरुन असे स्पष्ट होते की, त्या काळात सती जाणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण जास्त होते.

राजाराम मोहनरॉय यांनी समाजातील प्रचलित प्रथा परंपराविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या मते राजकीय, सामाजिक व धार्मिक स्थितीचा परस्पराशी संबंध असतो. म्हणून त्यांनी धार्मिक सुधारणेवर अधिक भर दिला. त्यांनी स्त्रियांना संपत्तीचा अधिकार मिळावा म्हणून प्रयत्न केले. सतीप्रथेविरुद्ध त्यांनी लिखाण केले. त्यात त्यांनी ३ पुस्तके बंगाली भाषेत व चार पुस्तके इंग्रजीमध्ये लिहिली व नि:शूल्क वितरीत केली. समाजात सतीप्रथेबद्दल जाणीव जागृत व्हावी हा त्याचा त्यामागचा उद्देश होता. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर अनेक पत्रिकात लेख लिहून सतीप्रथेविरुद्ध प्रचार केला. सती जाणाऱ्या स्त्रियांचे मन परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. या सतीप्रथेचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. याचाच परिणाम म्हणून ४ डिसेंबर १८२९ रोजी सतीप्रथेविरुद्ध कायदा करण्यात आला. परंतु कर्मठ व्यक्तींना मान्य नव्हते. म्हणून ५० हजार कर्मठ व्यक्तींनी कायद्याविरुद्ध एक आवेदन लॉर्ड बैंटिंक कडे दिले परंतु राजाराम मोहनरॉय यांनी शास्त्र, स्मृतीग्रंथ यांचा आधार घेऊन असे सिद्ध केले की, कोणत्याच धार्मिक ग्रंथात सतीप्रथेचा उल्लेख नाही.

या कर्मठ व्यक्तींनी राजाराम मोहनरॉय विरुद्ध संघर्ष केला व त्यांची हत्या करण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. राजाराम मोहन रॉय यांनी स्त्रियांच्या अधिकाराचे अपहरण यासंबंधी पुस्तक लिहिले. **'मॉडर्न अप्रोचमेंट ऑन दि एन्शियेंट राइट्स ऑफ हिंदू फिमेल्स एकार्डिंग टू दि हिंदु लॉ इन्हेरीहेन्स'** हे पुस्तक १८२२ मध्ये प्रकाशित झाले. त्यात त्यांनी हे स्पष्ट केले की, हिंदुशास्त्र व स्मृतीद्वारा स्त्रियांना अधिकार देण्यात आले होते. परंतु मध्ययुगीन काळात ते सुपष्टात आले. यासंदर्भात कार्तिक दत्त लिहितात, स्त्रियांना अपमान व शोषण यातून मुक्ती मिळावी म्हणून ती सती जात होती. कारण स्त्रियांना संपत्तीचा अधिकार नाकारल्यामुळे सतीप्रथा, बहुविवाह यासारख्या समस्या उद्भवल्या. राजाराम मोहन रॉय यांनी बहुपत्नी विवाहाला विरोध केला.

**निष्कर्ष :** राजाराम मोहनरॉय यांची स्त्रीउद्धारात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका आहे. अध्ययनात असे आढळून आले की, त्या काळात स्त्रियांची स्थिती अत्यंत वाईट होती. त्यांना सर्व अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यामुळे त्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. त्यापैकी सती जाणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण जास्त आढळून आले. प्रामुख्याने ही प्रथा हिंदू धर्मात आढळून आली. या समस्येचे उच्चाटन करण्याचे काम राजाराम मोहन रॉय यांनी केले व स्त्रियांना त्यांचे अधिकार मिळवून दिले व स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणली.

## संदर्भ


१) शर्मा, रमा. मिश्रा एम.के. २००९. महिला विश्वकोष. दिल्ली : अर्जुन पब्लिशिंग हाऊस.
२) गंगवार, ममता. २००९. इतिहास के आईने में महिला सशक्तीकरण. कानपुर : सरस्वती प्रकाशन.
३) ठाकूर, रवीन्द्रनाथ. महात्मा राजाराम मोहनरॉय जीवन चरित्र
४) शुक्ला, अंजु. पाण्डेय, रश्मी. २०१२. आधुनिकता और भारतीय समाज. कानपुर : रोशनी पब्लिकेशन.
५) दत्त, कार्तिक चन्द्र. राजाराम मोहनरॉय : जीवन और दर्शन, लोकभारती प्रकाशन, इलाहाबाद
६) गुप्ता, विश्वप्रकाश एवं गुप्ता मोहिनी. १९९९. स्वतंत्रता संग्राम और महिलाएँ. नमन प्रकाशन, नई दिल्ली
७) www.alsaikshare.com/nodel १३
८) http/www.google.co.in ९) loksatta.com Nov.३०, २०१३ १०) https//m.baskar.com


❑❑❑

**34**

# सामाजिक परिवर्तन साहित्य से ही संभव है

**डॉ, टी, श्रीनिवासुलु**
असोसियट प्रोफेसर,
यस, वी, महाविद्यालय, अनंतपुरमु, आन्ध्रप्रदेश

साहित्य समाज का अभिन्न अंग है। साहित्य को अलग नहीं किया जाता है। इसका शाब्दिक अर्थ सहित होना। ''सहितस्य भावः साहित्यं'' जिसका उद्देश्य साथ होना है। ''हितेन सह सहितं'' हित के साथ होना ही साहित्य है। इस शाब्दिक अर्थ से साहित्य का मुख्य उद्देश्य सह–साथ होना, हितं–हित का होना ही साहित्य का अर्थ है। अब प्रश्न यह उत्पन्न होता है – हित किसकी हो? इस प्रश्न का एक ही उत्तर है – समाज का हित। इसलिए साहितय का उद्देश्य समाज का हित ही है। इस संदर्भ में साहित्य साहित्य के लिए या समाज कल्याण केलिए? यह प्रश्न असंगत है। साहित्य का सृजन मनोउल्लास केलिए या मनोभिव्यक्तिकरण केलिए है। व्यक्ति को कुछ न कुछ लाभ हो। व्यक्ति और समाज को लाभान्वित करना ही साहित्य का उद्देश्य है। साहित्य को अंग्रेजी में लिट्रेचर कहते है। लिट्रेचर शब्द लेटर्स से बनी है। अक्षरों से जो भी बनते है व्यापक रुप में उसे साहित्य ही कहते है। परंतु आज साहित्य का अर्थ संकुचित रुप में काव्य केलिए प्रयुक्त हो रहा है। साहित्य का रुप पर ध्यान न दे कर उसकी उपयोगिता पर ज्यादा ध्यान देना है। हमारे लिए साहित्य दो रुपों में विभाजित है, एक काव्य और दूसरा शास्त्र है। कुछ लोग संकुचित दृष्टिकोण से विज्ञान को साहित्य नहीं मानते हैं।

व्यापक दृष्टिकोण से देखा जाय तो, समाज के लिए उपयोगी हर प्रकार की रचना साहित्य मानना होगा। विज्ञान में निहित साहित्यक गुण यथार्थ तक सीमित रह जाते है। काव्य साहित्य में जो कल्पना अपने पंखों से हमे आदर्श की ओर ले जाती है। विज्ञान साहित्य का जो स्वरुप निराशाजनक चेतन रहित वस्तु मात्र है। परंतु काव्य दृष्टि से देखने पर प्रकृति के कण–कण में शिव तत्व दृगोचर हैं। साहित्य का उद्‌भव हमारे भावनाओं की अभिव्यक्ति केलिए किया जाता है। साहित्य में भावाभिव्यक्तिकरण की प्रबल इच्छा होती है। साहित्य का उद्देश्य आत्मानंद को प्राप्त करना होता है। कवि किसी काव्य की सृजन क्यों कर रहा है। स्वांतः सुखया? या बहुजन सुखाय एवं बहुजन हिताय? इस पर साहित्य का स्थर और उद्देश्य स्पष्ट होते है। साहित्य के उद्‌भव का मुख्य कारण स्वाभाविक अभिव्यक्ति की मूल मानवीय प्रेरणा ही है। इसी से यह विचार स्वांतः सुखाया जन्मा है। यह एक संकुचित दृष्टिकोण है। केवल स्वार्थ प्रेरणा से उद्‌भूत काव्य की सृजना मानी जाती है। यथार्थ वादियों को मानना है। साहित्य मानव केलिए आवश्यक नहीं है। जैसे भोजन और पेय जल आवश्यक होते हैं। अर्थ शास्त्रियों का कहना है, यह साहित्य अतिरिक्त शक्ति है। सरप्लस एनर्जि जो शक्ति शरीर में बच जाता है। उसी से साहितय का सृजन करते हैं।[1] साहित्य कोई शारीरिक आवश्यकता नहीं हैं। यह एक सांस्कृतिक आवश्यकता हैं। विशाल दृष्टिकोण से देखने पर साहित्य की आवश्यकता ज्ञात होता है। आचार्य महावीर प्रसाद द्विवेदी जी कहते हैं –

अंधकार है वहाँ जहाँ
आदित्य नहीं है।

मुर्दा है वह देश जहाँ
साहित्य नहीं है।[2]

उत्तम साहित्य से ही उत्तम समाज का निर्माण हो सकता है। मनुष्य को मानवीय दुर्बलताओं से ऊपर उठा कर दैवी शक्ति प्रदान करना साहित्य का उद्देश्य है। साहित्य और समाज एक दूसरे पर निर्भर हैं। समाज के रुप को साहित्य में दर्शाया जाता है। यात्री मेगस्तनीस के ग्रंथ इण्डिका में चन्द्रगुप्त मौर्य के शासनकाल के परिस्थितियाँ सुस्पष्ट दृगोचर होते हैं। समाज के गतिविधियाँ साहित्य के अंश होते हैं। साहित्य का मूल स्त्रोत समाज ही है। साहित्य के लिए आवश्यक कथा वस्तु समाज से